सन २०१७-१८ खो-खो, कबड्डी, कुस्ती व व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजनासाठी निधी वितरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक : निविप्र ४०१७ /प्र.क्र.१३० /क्रीयुसे -२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

तारीख : २७ सप्टेंबर,२०१७.

वाचा

१. शासन निर्णय क्र.क्रीडाधो-२०११/प्र. क्र. ५५/११/क्रीयुसे-१, दि. १४ जून, २०१२.

२. शासन निर्णय क्र. क्रीस्पर्धा २०१२/प्र. क्र. २२५/१२/क्रीयुसे-२, दि. ३ नॉव्हेंबर, २०१२,

३. शासन निर्णय क्र. क्रीस्पर्धा२०१२/प्र. क्र. २२९/१२/क्रीयुसे-२, दि. ३ नॉव्हेंबर, २०१२,

४. शासन निर्णय क्र. क्रीस्पर्धा १००९/प्र. क्र.(६६/०९)/क्रीयुसे-२, दि. ७ फ़ेब्रुवारी, २०१३,

५. शासन निर्णय क्र. क्रीस्पर्धा२०१२/प्र. क्र. २३४/१२/क्रीयुसे-२, दि. १८ जानेवारी, २०१३

६.वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं - २०१७ / प्र.क्र ९४ /अर्थ-३ ,दि.३०.०६.२०१७.

प्रस्तावना -

राज्याचे क्रीडा धोरण २०१२ मधील मुद्दा क्रमांक ५.४ नुसार खेळाडूंना सकस आहार , निवास व्यवस्था, प्रेक्षक गॅलरी, प्रवास खर्च , पारितोषिके, आयोजनावरील खर्च पाहता छत्रपती शिवाजी चषक कबड्डी स्पर्धा , खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धा , कै. भाई नेरुरकर चषक खो खो व व्हॉलीबॉल चषक स्पर्धा या स्पर्धेसाठी प्रत्येकी रु. ५०.०० लक्ष अनुदान मंजूर करण्यात आले आहे. सदर क्रीडा धोरण हे नियोजन विभाग, वित्त विभागाच्या तसेच मंत्रीमंडळाच्या मान्यतेने निश्चित करण्यात आले आहे.

सन २०१७-१८ या वर्षांमध्ये छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा, स्व. खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धा, कै. भाई नेरुरकर चषक खो-खो स्पर्धा व छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय कबड्डी या स्पर्धा आयोजनासाठी अर्थसंकल्पित निधीच्या वितरणास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या वर्षा मध्ये छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा, स्व. खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धा, कै. भाई नेरुरकर चषक खो-खो स्पर्धा व छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय कबड्डी या स्पर्धाचे आयोजन करण्यारिता प्रत्येकी रु.५०.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित आहे. त्यापैकी प्रत्येकी रु.३५.००लक्ष इतकी रक्कम वितरित करण्यास व सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	स्पर्धा	लेखाशिर्षक	वितरीत निधी
१.	छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा	२२०४-क्रीडा व युवक सेवा-१०४-क्रीडा व खेळ (०९) (१०) व्हॉलीबॉल चषक स्पर्धा (२२०४ ५४०१)-३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)	रु.३५.०० लक्ष
२.	स्व. खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धा	२२०४-क्रीडा व युवक सेवा-१०४-क्रीडा व खेळ,(२६) कुस्ती स्पर्धा (२६) (०१) खाशबा जाधव राष्ट्रीय स्पर्धा (२२०४ २०३७)-३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)	रु.३५.०० लक्ष
३.	कै. भाई नेरुरकर चषक खो-खो स्पर्धा	२२०४-क्रीडा व युवक सेवा-१०४-क्रीडा व खेळ, (०९) खेळाडूंना शिष्यवृत्ती व पुरस्कार, (०९) (११) खो खो चषक स्पर्धा (२२०४ ५४१२)-३१ सहाय्यक अनुदाने	रु.३५.०० लक्ष
४.	छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय कबड्डी	२२०४-क्रीडा व युवक सेवा-१०४-क्रीडा व खेळ,(३१) कबड्डी चषक (३१) (०१) छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय कबड्डी क्रीडा स्पर्धा (२२०४ २०४६) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)	रु.३५.०० लक्ष

२. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे. उपरोक्त स्पर्धा आयोजनासाठी वाढीव अनुदान देण्याबाबत संदर्भाधीन क्र.२ ते ५ च्या शासन निर्णयामधील अटी व शर्ती लागू राहतील.

३. वित्त विभागाच्या दि.१८.०४.२०१७ व ३०.०६.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये निधी वितरणाचेअधिकार विभागास आहेत. यापूर्वी वितरीत केलेल्या अनुदानापैकी ७५% पेक्षा अधिक खर्च झाला आहे. ज्या लेखाशिर्षाखाली अनुदान वितरीत करण्यात येत आहे त्या लेखाशिर्षातंर्गत गतवर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

४. वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.१८.०४.२०१७ व दि.३०.०६.२०१७ च्या परिपत्रकातील सूचनानुसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधित उप संचालक/ जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त (क्रीडा)यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२७१७३११२३८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Deepak Vijay Shelar

Digitally signed by Deepak Vijay Shelar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6cd30ed620a4fe01f24cb84cc86e70f3b8f6f1fdcdb2469570c78dabb9acf4ba, cn=Deepak Vijay Shelar
Date: 2017.09.27 17:20:55 +05'30'

(दीपक शेलार)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा)यांचे खाजगी सचिव
२) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५) महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
६) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
७) सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत)
८) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
९) निवडनस्ती, क्रीयुसे-२